ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I | ISSUE-II | JULY | 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# वामन मल्हार जोशी यांचा 'रागिणी' या कांदबरीतील स्त्री विषयक दृष्टिकोन

संशोधक विद्यार्थिनी
**नागिमे अनुसया नागनाथ**
दयानंद कला महाविद्यालय,लातूर

मराठी कादंबरी वाङ्मयात हरिभाऊ आपटेनंतर स्वतंत्र युग निर्माण करणारे लेखक व कादंबरीकार म्हणून वामन मल्हार जोशी यांना ओळखले जाते. ''तात्विक कादंबरीचे जनक' म्हणून वामनरावांचा श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी गौरव केलेला आहे. या गौरवाची साक्ष पटविणारे असेच त्यांच्या कादंबरीचे स्वरुप आहे. 'काव्यशास्त्रविनोद' प्रवण असलेली त्यांची 'रागिणी' जेव्हा प्रसिध्द झाली (१९१५) तेव्हा तिची उंच वैचारिक बैठक पाहून आणि तिच्यातील बहुरंगी तत्वचर्चेने मोहून जाऊन त्यावेळेचा महाराष्ट्रातला बुध्दिनिष्ठ, अभिजात व उच्चशिक्षित वाचकवर्ग तिच्याकडे एकदम आकृष्ट झाला''[१]

'रागिणी' या कादंबरीतील रागिणी व उत्तरा या स्त्रिया सुशिक्षित असून त्या पुरुषांच्या बरोबरीने वादविवादात, गप्पागोष्टीत उत्साहाने व हिरीरीने भाग घेतात. तसेच या स्त्रिया अविवाहित असूनही अविवाहित पुरुषांशी मोकळेपणाने बोलतात, गप्पा मरतात व वादविवाद करतात. वामनरावांनी तत्कालीन महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय सुशिक्षीत स्त्रियांचे जीवन, समस्या, स्वभाव, वृत्ति, विचार इ. गोष्टीला अनुसरुन रागिणी व उत्तरा या स्त्रियांचे चित्रण केले आहे. स्त्री विषयक विविध प्रश्नांचा विचार हरिभाऊ आपटेनंतर वामन मल्हार जोशी यांनी केला असल्यामुळे त्यांचा स्त्री विषयक दृष्टिकोन काय होता याचा परिचय आपणास करुन घेणे आवश्यक आहे.

''वामनरावांच्या कालापर्यंत शिक्षणाचा परिणाम होत होता. स्त्रियांची मजल विद्यालय व महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत गेली होती. या शिक्षणाच्या आधारे स्त्री बोलकी झाली होती. वामनरावांनी अशी सुशिक्षित स्त्रीच आपले माध्यम मानली व तिच्याद्वारे तत्कालीन स्त्रीजीवन विषयक सामाजिक व व्यक्तिगत प्रश्नांचे विशदीकरण केले.''[२]

रागिणी या कादंबरीतील ''उच्चतम पावित्र्य, श्रेष्ठ धारिष्ट आणि आनंदयुक्त शांतता हाच तिचा स्वभाव होता. आणि सामान्य सुख–लालसा, लोकनिंदेची भीति व औदासिन्य ही तिची क्षणिक विकृति होती.''[३] अशी रागिणीची व्यक्तिरेखा वामनरावांनी चित्रित केली आहे. तर ''उत्तरेची बुध्दि जशी तीव्र होती, तसेच तिचे मनहि शुध्द, निष्कपट आणि प्रेमळ होते. परंतु शिक्षणामुळे तिचे विचार बरेचसे बदलेले होते व तिच्यामध्ये विलक्षण वावदुकता आली होती.

जातीजातीमधील भेद तिला मुळीच पसंत नव्हता व आपल्या समाजातील स्त्री–पुरुष वर्गामधील कृत्रिम भेद तर तिला बिलकुल आवडत नव्हता. ब्राम्हणांनी इतर जातींना खाली ठेवण्याचा जसा प्रयत्न केला तसाच प्रयत्न, सर्व पुरुष जातीने स्त्री वर्गाला खाली दडपण्यासाठी केला व अजूनही तसा प्रयत्न पुरुषवर्गाकडून होत आहे, असे उत्तरा उघडपणे प्रतिपादन करीत असे. मनु, याज्ञवल्क्य इत्यादी ब्राम्हणाभिमानी आणि स्त्रीद्वेष्टया जुन्या शास्त्रकारांचे विशेषत: मनूचें नांव घेणेहि तिला पाप वाटत असे.''[४] अशी स्वातंत्र्यवादिनी उत्तरेची व्यक्तिरेखा रागिणीपेक्षा भिन्न आहे.

''नव्या येणाऱ्या शिक्षणाचा दोन तऱ्हेच्या स्त्री स्वभावावर किती भिन्न परिणाम घडू शकतो हे तर या निर्मितीतून फारच सूक्ष्मपणे चित्रित झाले आहे. या दोघेहि मुली ध्येयवादी पण स्वभाव व वृत्ति यांत केवढा फरक! आणि त्यांतली एकहि खलप्रवृत्तीची अगर उच्छृंखल नाही हा विशेषहि नमूद करण्यासारखा आहे. शिक्षणाने स्त्रीच्या बौध्दिक व मानसिक शक्तीचे विकसन होते व त्यामुळे तिच्या वृत्तीला वैचारिकता आणि दूरदर्शीपणा यांची जोड मिळते. भिन्नगुणी स्त्रीवर शिक्षणाचे भिन्न संस्करण झाले तरी त्यातूनहि सत्प्रवृत्तीचे पोषण होते, अनिष्टाचें होत नाही, हे उत्तरेच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट करुन स्त्रीशिक्षणाबद्दल त्यांनी अनुकूल विचार दिग्दर्शित केले आहेत. अर्थात स्त्री जीवनाबाबत फक्त शिक्षणाचीच सुधारणा पुरेशी होती असे नव्हे तर, मुलींना शिक्षण देणे याच एका प्रश्नातून अनेक समस्या निर्माण होतात, हीहि वामनरावांना स्पष्ट कल्पना होती. पहिली समस्या विवाहाबद्दलची. हा विवाहाचा प्रश्न नव्या स्त्रीजीवनात बराच अडचणीचा होऊ पाहत होता.''[५] शिक्षणामुळे मुलींचे वय वाढून त्यांच्या विवाहात अडचणी येत असल्यामुळे आईसाहेब म्हणतात, ''मुलींचा बालविवाह करायचा नाही, आणि त्यांना शिक्षण द्यायचं, या स्तुत्य हेतूंनी त्यांनी पहिल्यानं मुलींना मुददाम अविवाहित ठेवलं; आणि आता मुली मोठया वाढल्या तेंव्हा योग्य वरच मिळत नाही, अन त्या मुलीहि अमका नको अन् तमका नको, असं म्हणायला लागल्या आहेत. –– अशी झाली आहे पंचाईत!''[६]

रागिणी व उत्तरा यांचे विवाहविषयक संभाषण चालू असताना रागिणी म्हणते, ''स्त्रियांची – – आणि विशेषत: आपल्या समाजातील स्त्रियांची – – स्थिति फार वाईट आहे, एवढी गोष्ट मात्र खरी. बहुतेकांना समजू लागायच्या आधीच – – अगदी लहानपणी – – त्यांचे आईबाप त्यांना कुणाच्या तरी गळयात अडकवून टाकतात; पण या मुलींची स्थिती आपल्यासारख्या समजू लागलेल्या मुलींच्यापेक्षा एका अर्थी फार बरी ! आपण धड इकडे ना तिकडे!''...''पण मोठया झालेल्या, शिकलेल्या मुलींना एखादया सच्छिल तरुणांन अशा एखादया नि मोठया मुलीचं मन आकर्षण करुन घेतलं तरी ही गोष्ट त्याला किंवा कोणालाहि सांगण्याची तिला चोरीच ना? यापेक्षा अजाणतेपणी लग्न झालेलं खरोखर फार बरं!''[७] स्त्रीशिक्षण हे स्त्रियांच्या व समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक असले तरी शिक्षणामुळे स्त्रियांच्या विवाहास विलंब होत असल्यामुळे प्रौढ अविवाहित स्त्रियांचा प्रश्न आधुनिक समाजात निर्माण होत असल्याचे वामनरावांनी सुचित केले आहे.

आधुनिक समाजातील स्त्रिया सुशिक्षित असल्यामुळे विवाहविषयक निर्णय घेताना त्या अधिक सक्षम झाल्या असून भविष्यकालीन दृष्टि ठेवून विवाहविषयक व्यापक व सखोल विचार करत असल्याचे वामनरावांनी दर्शविले आहे. उत्तरा आपले विवाहविषयक मत सांगताना रागिणीला म्हणते, ''प्रीतिविवाह रुढ नसले तर ते सुरु केले पाहिजेत!''... ''आपल्याच समाजात पूर्वी स्वंयवर नि प्रीतिविवाह होत नव्हते का? हल्लीची गुरासारखी ही लग्न, 'लग्न' म्हणण्यापेक्षा त्याला दुसरच एखादं नाव दिलेलं बरं!''[८], ''पण मला अजून कोणत्याही पुरुषाच्या अंकित होऊन राहावंस वाटत नाही.... माझ्याशी बरोबरीच्या नात्यानं राहायला तयार असलेल्या आणि मला प्रिय वाटणाऱ्या तरुणांशीच मी लग्न करीन!''[९], ''आपल प्रेम जर एखादयावर जडलं, तर त्या व्यक्तीला उघडपणे सांगण्यात चोरी ती कसली बाई? त्याला जर आपण पसंत असलो तर विवाह होईल नाहीतर ती गोष्ट तिथंच राहील याच्यांत वाईट ते काय झालं?''[१०] 'मी तर बोलून चालून सफ्रेजेट(Suffragette)आहे. मला स्वार्थी पुरुषांनी ठरविलेले विवाहासंबंधी ढोंगाचे Conventions (संकेत, मर्यादा, नियम), मुळीच पसंत नाहीत! पुरुषांच प्रेम बसंल, तर त्यांना मात्र प्रपोज (मागणी घालण्याचा) अधिकार, अन् बायकांच प्रेम जडलं तर त्यांनी 'प्रपोज' करु नये, हा कुठला विलायती न्याय! माझी जर एखादयावर प्रीति बसली, तर या पुरुषांनी घालून दिलेल्या स्त्रीमर्यादिला अन् ढोंगाच्या अन् नखऱ्याच्या लाजलज्जेला झुगारुन देऊन मी आपलं मन त्याला स्पष्ट सांगेन अन् विवाहाची विनंति करीन!''[११], ''गुरांसारख लग्न करुन घेण्यापेक्षा अविवाहितचं राहिलेलं मला बरं वाटत''[१२] यावरुन आधुनिक काळातील स्त्रियांना समाजात आचार, विचार व उच्चस्वतंत्र्य असावे याचा पुरस्कार वामनराव करतात. तसेच स्त्रियांनी परंपरेने घालून दिलेल्या मर्यादा, ढोंग, व भूमिका यांचे जोखंड फेकून देऊन स्वत:ची एक नवी प्रतिमा सिद्ध करावी असे त्यांनी सुचविले आहे. स्त्रियांच्या मनात प्रेम विवाहविषयक विचार आले तरी त्यांना ते व्यक्त करता येत नाहीत यांची खंत वामनराव व्यक्त करताना दिसतात. रागिणीचे भय्यासाहेबांवर प्रेम असून ती व्यक्त करीत नाही व उत्तरेलाही ती म्हणते, ''पण ताई, ही गोष्ट कुणाला सांगू नकोस हो! भाऊंना मी तोंड तरी कशी दाखवूं त्यांना हें कळलं तर?''[१३]

रागिणी ही सुशिक्षित असूनही तिची वृत्ति अध्यात्मिक आहे. पतीवर असलेल्या उत्कट प्रेमामुळे ती पतीच्या संसारत्यागाच्या इच्छेत अडथळा आणीत नाहीत. उलट ती ''मी कोणाच्या आत्मप्राप्तीच्या विरूद्ध का आहे....?''[१४] असे उत्तरेला म्हणते. रागिणीला पतीनिंदा आवडत नसल्यामुळे ती आनंदरावांजवळ म्हणते, ''बायकोच्या नादी लागण्यापेक्षा ईश्वरप्राप्ति करून घेणं वाईट का...?''[१५] पतीने संसारत्याग केला तरी त्याच्या उपदेशाचे पालन करून सासऱ्यांचा छळ व मारहाण सहन करून त्यांची सेवा करीत सासरीच राहते. पुनर्विवाहाला तिची वृत्ति अनुकूल नसली तरी वडिलांच्या इच्छेमुळे व आग्रहामुळे ती पुनर्विवाहास तयार होते. रागिणीचे जीवन अतिशय संघर्षात असले तरी भय्यासाहेबांच्या परत येण्यामुळे तिचे जीवन आनंदमय होते. रागिणीच्या व्यक्तिरेखेद्वारे वामनरावांनी स्त्री ही पुरूषाच्या ध्येयात आनंदाने सहभागी होते असे दर्शविले आहे. स्त्री—पुरूष नात्यात समन्वयवादी भूमिकेला ते प्राधान्य देताना दिसतात. स्त्री—पुरूष समान अधिकाराबद्दल वाद चालू

असताना रागिणी म्हणते, ''अधिकार कोणाचा आहे,' याचा नवरा बायकोने विचार करण्यापेक्षा 'प्रेम कोणाचे अधिक आहे' याचा विचार केला तर वाईट का!...''[१६]

उत्तरेची वृत्ति ही रागिणीपेक्षा भिन्न असल्यामुळे तिच्या व्यक्तिरेखेद्वारे वामनरावांनी स्त्री–पुरूष समानतेच्या तत्वाचा पुरस्कार केला आहे. उत्तरा आईसाहेबांना म्हणते, ''खराखेरच मी कुणाची फाजील प्रतिष्टा नाहीच ठेवायाची!''...हातातल काम तस्स टाकून पुरुषांना अगदी घरात पाय पडताक्षणी फराळाचे निं चहापाणी मिळालें पाहिजे, अशा तऱ्हेची बरदास्त बायकांनी नेहमी ठेवलीच पाहिजे, हें शास्त्र मला बिलकुल नाही पसंत! पुरुषांच्या चहापाण्याशिवाय बायकांना दुसरी कामंच नाहीत काय?''[१७]

'स्त्रीशिक्षण व स्त्रियांच्या कर्तव्या'चा विषय निघाला असताना उत्तरा म्हणते, ''आम्ही तत्त्वाकरिता भांडतो, सुखाकरिता नाही''... ''पुरुषांनी आम्हाला प्रेमान जरी वागविल, तरी जोपर्यंत ते आम्हाला बरोबरीच्या नात्यान वागवीत नाहीत, तोपर्यंत आमचं समाधान व्हायच नाही...''[१८] स्त्रिया बौध्दिक व शारीरिकदृष्टया पुरुषांपेक्षा कमकुवत नसल्याचे वामनरावांनी सुचित केले आहे.

हिंदु धर्मात स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम वागणूक व स्थान वामनरावांना अमान्य होते. त्यामुळे 'हिंदू धर्माचे रहस्य' या विषयावरील वादविवादात उत्तरा म्हणते, ''बायकोनं सत्यनारायणाच्या वेळेला वगैरे नवऱ्याच्या डाव्या हाताला हात लावून बसावं, घरचा स्वंयपाक करावा, मुलांची हगोली धुवावीत, हाच ना हिंदु बायकांचा धर्म!''[१९]

उत्तरेच्या रुपाने वामनरावांनी आधुनिक काळातील स्वातंत्र्यवादिनी स्त्रियांच्या विचारात, ध्येयात बदल होत असल्याचे चित्रण केले आहे. आपली मते परखडपणे व निर्भिडपणे मांडणारी उत्तरा मात्र आनंदरावांशी विवाह झाल्यावर, ''आपल्या माणसांशीं का कोणी वाद करत'' व ''मला तशी इच्छाच होत नाही. वाद न करता नम्रतेने प्रश्न विचारावेत, सेवा करीत राहावं, असंच मला वाटत...''[२०] असे रागिणीजवळ म्हणते. तसेच स्त्रीपुरुषाच्या अधिकाराबद्‌दल आपले मत व्यक्त करताना ती रागिणीला म्हणते, ''जिथ खरं प्रेम आहे, तिथं कमी अधिक अधिकाराचा प्रश्नच नाहीसा होतो. पतीचा मोठेपणा वाढावा, पतीची सत्कीर्ति वाढावी, त्याला सुख व्हावं, त्याच्या मनाला नेहमी शांती मिळावी, हीच पत्नीची जिथं इच्छा आहे, व पत्नीला सुख व्हावं, तिला आईबापाचं घर सुटल्याचं जाचक दु:ख होऊं नये, तिला आपलं घर म्हणजे स्वत:चं घर वाटावं, तिला सुशिक्षण मिळून तिची आत्मिक उन्नति व्हावी, दोघांच्या संसाराचा गाडा आनंदात व सुखसमाधानात चालावा, अशी जिथं पतीची इच्छा आहे, तिथं अधिकाराच्या प्रश्नाला अर्थ काय उरला?''[२१]

उत्तरेच्या स्वभावातील व विचारातील परिवर्तन झाल्याचे दाखवून वामन मल्हार जोशी यांनी स्त्री पुरुष नात्यात बदल होत असल्याचे सूचित केले आहे.

वामन मल्हार जोशी यांच्या 'रागिणी' या कादंबरीतील स्त्रीविषयक दृष्टिकोनाचे अवलोकन करून पुढील निष्कर्ष काढलेले आहेत.

**निष्कर्ष :**

१. वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबरीत महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुण स्त्रियांचे चित्रण अतिशय व्यापक व उदार दृष्टिकोनातून केले आहे.
२. वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबरीमध्ये शिक्षणाचा स्त्रियांवर होणारा परिणाम चित्रित केला आहे.
३. वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबरीत शिक्षणामुळे स्त्रियांच्या जीवनात निर्माण होणारे प्रश्न मांडले आहेत. उदा. प्रौढ अविवाहित कुमारिकांचा प्रश्न, विवाहाबाबत सुशिक्षित स्त्रियांच्या वाढलेल्या अपेक्षा.
४. वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबरीत आधुनिक काळातील सुशिक्षित स्त्रियांच्या इच्छा, आकांक्षा, विचार इत्यादीचे चित्रण करताना सहानुभूतीपूर्ण दृष्टिकोनाचा स्विकार केला आहे.
५. वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबरीत आधुनिक काळातील स्त्रियांच्या बाबतीत त्यांना आचार स्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य असावे असा आग्रह केला आहे.
६. वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबरीत स्त्रियांना पुरुषाप्रमाणे हक्क, अधिकार व कर्तव्य असावेत असे सुचविले आहे.
७. वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबरीत आधुनिक काळातील स्त्रिया पुरुषापेक्षा कमकुवत व दुबळया नसून त्या सक्षम आहेत असे सुचविले आहे.
८. वामन मल्हार जोशी आपल्या कादंबरीत स्त्री ही पुरुषाच्या ध्येयात, कर्तव्यात व कार्यात सहाय्यक असते असे सुचविले आहे.
९. वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबरीत स्त्री–पुरुषाच्या नात्यात बदल होत असल्याचे दर्शविले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. कुलकर्णी श्री.मा. (१९५६): कादंबरीची रचना, उन्मेष प्रकाशन, कर्नलबाग नागपूर, प्रथम आवृत्ती, पृष्ट क्र.६६
२. डॉ.संत दु.का. (२००३) : मराठी स्त्री, पद्मगंधा प्रकाशन, पांडूरंग कॉलनी, एरंडवन, पुणे ४११०३८, द्वितीय आवृत्ती, पृष्ट क्र.१५४
३. जोशी वा.म. (१९६३) : 'रागिणी' बलवन्त पुस्तक भाण्डार, गिरगांव नाका, मुंबई, सहावी आवृत्ती, पृष्ट क्र.३५
४. तत्रैव, पृष्ट क्र.०२

५. सौ. दांडेकर मालती (१९६१) : मराठी कादंबरीतील अष्टानायिका, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणे, प्रथम आवृत्ती, पृष्ट क्र. ४४—४५.

६. जोशी वा.म. (१९६३) : 'रागिणी' बलवन्त पुस्तक भाण्डार, गिरगांव नाका, मुंबई, सहावी आवृत्ती, पृष्ट क्र.२१

७. तत्रैव, पृष्ट क्र.२६

८. तत्रैव, पृष्ट क्र.२५

९. तत्रैव, पृष्ट क्र.२५

१०.तत्रैव, पृष्ट क्र.२५

११.तत्रैव, पृष्ट क्र.२६

१२.तत्रैव, पृष्ट क्र.२६

१३.तत्रैव, पृष्ट क्र.२८

१४.तत्रैव, पृष्ट क्र.७२

१५.तत्रैव, पृष्ट क्र.१३६

१६.तत्रैव, पृष्ट क्र.३१७

१७.तत्रैव, पृष्ट क्र.७५

१८.तत्रैव, पृष्ट क्र.३१०

१९.तत्रैव, पृष्ट क्र.३१७

२०.तत्रैव, पृष्ट क्र.५२६

२१.तत्रैव, पृष्ट क्र.५२६—५२७